N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक शहर **P.S.(ठाणे):** सरकार वाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0059 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/02/2025 02:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 21/02/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/02/2025
**Time From (वेळेपासून):** 13:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/02/2025 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2025 02:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक,बाह्यरूग्ण विभागातील सर्जरी विभ, क्रमांक 20 मधील कक्षात
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राहुल राजेंद्र बोंद्रे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारसपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बिल्डिंग3,पोलीस कर्मचारी वसाहत, ,रूम नंबर 22, कल्याण पुर्व , कल्याण,सरकार वाडा,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बिल्डिंग3,पोलीस कर्मचारी वसाहत, ,रूम नंबर 22, कल्याण पुर्व , कल्याण,सरकार वाडा,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9082838331

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन रामचंद्र तिवडे | | | 1. शिवपुष्प सोसा रो हाउस नं 23 ,मिराद्वार लन्स समोर,माने नगर मेरी रासबिहारी ,सरकार वाडा, नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1500 | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

0.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर

दिनांक - 21/02/2025

माझे नांव श्री. राहुल राजेंद्र बोंद्रे, वयः- 33 वर्ष धंदाः- नोकरी, सध्या राहणारः- पोलीस कर्मचारी वसाहत, बिल्डिंग क्रमांक 3, रूम नंबर 22, कल्याण ( पुर्व ) मुळ राहणारः- मु. पो. पानोडी, ता. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर मोबाईल क्रमांक 9082838331

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी रेल्वे पोलीस दल, मुंबई येथे पोलीस शिपाई म्हणुन काम करीत आहे. माझा बक्कल क्रमांक 3412 असा असुन माझी नेमणुक वडाळा रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई येथे आहे. मला विधानसभा निवडणुक 2024 साठी जळगांव जिल्हा येथे नेमण्यात आले होते. त्यासाठी मी जळगांव जिल्हा येथील रावेर पोलीस-स्टेशन येथे निवडणुक बंदोबस्त केला. बंदोबस्त संपल्यानंतर मी दिनांक 21/11/2024 रोजी रेल्वेने नाशिक रोड रेल्वे स्टेशन येथे परत आलो व माझी बहिण नामे सौ. सोनल गणेश चकणे, रा. पाथर्डी फाटा, नाशिक शहर हिला भेटण्यास जाण्याकरिता नाशिक रोड बस स्थानकात बसमध्ये चढत असताना माझा थांबलेल्या बसमधुन तोल गेल्याने मी खाली जमिनीवर पडलो त्यात माझ्या हाताच्या उजव्या कोपरास मार लागला. त्यामुळे मी जवळच असलेल्या जयराम हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर प्रा. लि. नाशिक रोड येथे उपचारकामी दाखल झालो. तेथे माझ्या उजव्या हाताचा कोपर याचेवर शस्त्रक्रिया झाली व मला मी दिनांक 21/11/2024 रोजी ते दिनाक 21/02/2025 पावेतो आराम करण्याचा सल्ला देण्यात आला. त्यामुळे मी दिनांक 19/02/2025 रोजी पावेतो आराम करून दिनांक 20/02/2025 रोजी जिल्हा रूग्णालय, नाशिक येथ बाहय रूग्ण म्हणुन सी.आर.क्र. 271272500245951 अन्वये केस पेपर काढला व तेथील शिकाऊ वैदकीय अधिकारी यांना फिटनेस प्रमाणपत्र बाबत विचारले असता त्यांनी फिटनेस देणारे डॉक्टर उदया येणार आहेत उदया या असे सांगितले. त्यावर मी दिनाक 21/02/2025 रोजी पुन्हा जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे दोन नंबर ओ.पी.डी. मध्ये असलेले डॉक्टर यांना भेटलो त्यांनी मला तपासुन माझ्याकडे असलेल्या केस पेपरवरPt Fit For duty  असा रिमार्क मारून खाली सही केली व बाहेर जाऊन 'मामाला जाऊ भेटा, ते सर्व करून देतील' असे सांगितले. त्यावर मी ओ.पी.डि. क्रमांक 02 च्या बाहेर असलेले एक इसम यांना भेटलो व त्यांना मी मला फिटनेस सर्टिफिकेट पाहिजे असे सांगितले असता त्यांनी 'डॉक्टरला 3 ते 4 हजार रूपये दयावे लागतील तेंव्हा ते त्याच्यावर सही व शिक्का देतील, नाहीतर फिटनेस प्रमाणपत्र मिळणार नाही' असे सांगितले. त्यावर मी त्यांना त्यांचे नांव व पद विचारले असता त्यांनी मला त्यांचे नांव नितीन तिवडे असे सागुन ते कक्षसेवक असल्याचे सांगितले. त्याना मी परत येतो असे सांगुन शासकीय जिल्हा रूग्णालय, नाशीक येथुन निघुन आलो.

मी कोणत्याही खोटया आजाराचा बहाणा करून अथवा कोणतेही गैरप्रमाणपत्र मागत नसल्याने व मी आजारी असलेबाबत जयराम हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर प्रा. लि. नाशिक रोड येथे उपचार घेतलेले असल्याने सदरील कागदपत्र बघुनच मला ओ.पी.डी.क्रमांक 02 (अस्थीराग विभाग) मध्ये उपस्थित असलेल्या वैदयकीय अधिकारी यांनी OUT PAITENT RCORD (OPD Evening Shift) यावर Pt Fit For duty असा रिमार्क मारला आहे. परंतु मला मी नाशिक रोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथुन घेतलेल्या पो.स.80/म./पी.एम.80/म या

फॉर्मवर मी कर्तव्य करण्यास सक्षम असलेबाबत ( Fit For duty ) असा रिमार्क मारून शासकीय वैदयकीय अधिकारी यांची सही व शिक्का पाहिजे होता. परंतु कक्षसेवक नितीन तिवडे हे मला ते नेमणुकीस असलेल्या जिल्हा रूग्णालय, नाशिक येथील कर्तव्यावर असलेल्या वैदयकीय अधिकारी यांचेशी असलेल्या संबधाचा प्रभाव माझ्यावर टाकुन मला 3 ते 4 हजार रूपये लाच म्हणुन मागत होते. मी त्यांना लाच दिली नसती तर त्यांनी मला मी कर्तव्य करण्यास सक्षम असलेबाबत प्रमाणपत्र दिले नसते. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने व माझे काम कायदेशिर असल्याने तसेच माझ्यात आणि कक्षसेवक नितीन तिवडे यांच्यात काहीएक आर्थिक व्यवहार नसल्याने मी त्यास कोणतेही पैसे देणे लागत नव्हतो.

म्हणुन मी दिनांक 21/02/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक संदिप घुगे यांचेकडे वरील हकीगतीची लेखी तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने श्री. संदीप घुगे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी दिनाक 21/02/2025 रोजी नितीन रामचंद्र तिवडे हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला व पंच क्रमांक 1 श्री. शुभम शेवाळे यांना माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवून माझे कडील फोर व्हिलर कारने शासकीय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे पाठविले. त्यावरून मी व पंच क्रमाक 1 श्री. शुभम शेवाळे असे फोर व्हिलर कारने शासकीय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे गेलो असता शासकीय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथील दोन नंबर ओ.पी.डी. येथे माझी व लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे, कक्षसेवक यांची भेट झाली.

लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे यांची व माझी मी वरीलप्रमाणे तक्रार देण्यापुर्वी शासकीय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी माझ्याकडील नाशिक रोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथुन घेतलेल्या पो.स.80/म./पी.एम.80/म या फॉर्मवर मी कर्तव्य करण्यास सक्षम असलेबाबत ( Fit For duty ) असा रिमार्क मारून शासकीय वैदयकीय अधिकारी यांची सही व शिक्का मारून देण्याच्या मोबदल्यात 3 ते 4 हजार रूपये लाच मागितली होती. त्यामुळे मी त्यांना नाशिक रोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथुन घेतलेल्या सिकपास मेमोवर शासकीय वैदयकीय अधिकारी यांची सही व शिक्का मारून देण्याच्या मोबदल्यात किती रक्कम लाच म्हणुन दयावी लागेल या अर्थाने ए.टी.एम. मधुन किती रक्कम काढु या अर्थाने ''किती काढु सांगा ना ?'' असे विचारले असता त्यांनी ''दिड दोन हजार रूपये देवून टाक'' असे बोलुन माझ्याकडे दिड हजार रूपये ते दोन हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी खात्री होण्यासाठी पुन्हा लोकसेवक नामे नितीन तिवडे यांना '' दोन काढु ?, दिड न करा, दोन मध्ये होईलच म्हणा '' असे म्हणुन दोन हजार रूपये न घेता दिड हजार रूपये लाच देण्यास तयार असल्याचे सांगितले असता लोकसेवक नामे नितीन तिवडे यांनी '' सांगतो मी, दिड ही सांगल ना, दोन काढुन ठेवा '' असे बोलुन मी नाशिक रोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथुन घेतलेल्या पो.स.80/म./पी.एम.80/म या फॉर्मवर मी कर्तव्य करण्यास सक्षम असलेबाबत (Fit For duty ) असा रिमार्क मारून शासकीय वैदयकीय अधिकारी यांची सही व शिक्का मारून देण्याच्या मोबदल्यात दिड हजार रूपये लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो व त्यांना घडलेली हकिगत सांगुन लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे यांनी माझे प्रलंबित असलेले काम करून देण्याच्या मोबदल्यात माझेकडे 1500/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याच मान्य केले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे, कक्षसेवक यास लाच म्हणुन देणेकामी हजर केलेल्या लाचेच्या 500/- रूपये दराच्या 3 चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्यास त्यांना देणेकामी माझ्याकडे दिले व लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे यांनी लाच स्विकारल्यास पुर्वनियोजित इशारा करणे बाबत सांगितले.

त्यानंतर माझी व लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे, कक्षसेवक यांची शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे भेट होणार असल्याने पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांनी सोबत व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला, पंच श्री. शुभम शेवाळे यांचेसह माझेकडील चारचाकी वाहनाने रवाना केले व तेथे पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांनी सापळा आयोजित केला. त्यावेळी शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथील बाहयरूग्ण विभागातील सर्जरी विभाग क्रमांक 20 असे नमुद केलेल्या कक्षात माझी व लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे यांची भेट झाली. त्यावेळी त्यांचेत व माझ्यात मी कर्तव्य करण्यास सक्षम असलेबाबतचे फिटनेस प्रमाणपत्रावर वैदयकिय अधिकारी यांच्या सहया झाल्या अगर कसे ? याबाबत विचारले असता त्यांनी लाचेची मागणी पडताळणी दरम्यान माझेकडुन घेतलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नाशिक रोड पोलीस स्टेशन यांचा शिक्का व सही असलेल्या दिनांक 22/11/2024 रोजीच्या पो.स. 80/म./पी.एम.80/म या फॉर्मवर पाठीमागील बाजुस रिक्त असलेल्या ठिकाणी माझे नाव व दिनांक नमुद करून कोणत्या तरी वैदयकिय अधिकारी यांचेकडुनFit For duty  असा रिमार्क मारून  Medical Officer CL-2,

General Hospital Nashik यांचा शिक्का मारून सही घेतल्याचे मला दाखविले व मला इशा-याने लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता मी त्यांनी मागणी केलेली 1500/- रूपये लाचेची रक्कम त्यांच्या समोर धरून '' बावीस तारीख दिली ना'' असे म्हणालो असता लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे यांनी सदरील कक्षातील टेबलवर ठेवलेल्या लाल रंगाच्या रजिस्टरकडे बोट करून ''हे येच्यात टाकुन दया, हे वर ठेवून दया'' असे म्हणुन मागणी केलेली लाचेची रक्कम शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथील बाहयरूग्ण विभागातील सर्जरी विभाग क्रमांक 20 मधील कक्षात असलेल्या टेबलवरील लाल रंगाच्या YOUVA असे नमुद असलेल्या रजिस्टरमध्ये ठेवण्यास सांगुन दिनांक 21/02/2025 रोजी 13.40 वाजता स्विकारली. त्यानंतर लागलीच मी सदरील कक्षातुन बाहेर येवून पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांना लाचेची रक्कम स्विकारले बाबत सांगितले. त्यावेळी सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक संदीप घुगे व सापळा पथकातील सदस्य आले त्यांनी लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे यास सदर ठिकाणी त्यांची ओळख देवुन त्याचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव नितीन रामचंद्र तिवडे, वय- 56 वर्ष, धंदा- नोकरी, कक्ष सेवक, शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक राहणार:- रो-हाऊस नंबर 23, शिवपुष्प सोसायटी, मीराव्दार लान्ससमोर, माने नगर, मेरी-रासबिहारी लिंक रोड, नाशिक असे सांगितले. सदर केलेल्या कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दिनांक 21/02/2025 रोजी लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे, कक्ष सेवक, जिल्हा शासकिय रूग्णालय, नाशिक यांनी ते नेमणुकीस असलेल्या शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथील कर्तव्यावर असलेल्या वैदयकीय अधिकारी यांचेशी असलेल्या संबधाचा प्रभाव माझ्यावर टाकुन मी नाशिक रोड.पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथुन घेतलेल्या पो.स.80/म./पी.एम.80/म या फॉर्मवर मी कर्तव्य करण्यास सक्षम असलेबाबत (Fit For duty) असा रिमार्क मारून शासकीय वैदयकीय अधिकारी यांची सही व शिक्का मारून देण्याच्या मोबदल्यात माझेकडे 1500/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दिनांक 21/02/2025 रोजी 1.40 वाजता शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक येथील बाहयरूग्ण विभागातील सर्जरी विभाग क्रमांक 20 मधील कक्षात माझेकडुन स्विकारले म्हणून माझी लोकसेवक नामे नितीन रामचंद्र तिवडे, कक्ष सेवक, शासकिय जिल्हा रूग्णालय, नाशिक यांचेविरूध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Samadhan Nagnath Chavan
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** PI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
सरकारवाडा पोलीस ठाणे
नाशिक शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Suresh Shivnath Av
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI